# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 05/06/2020 (शुक्रवार)
(दुपार)

### अपघातात मृत्यु

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावरील मौजा येथे दिनांक 03/06/2020 चे 18:15 वा. ते 18:30 वा. दरम्यान अज्ञात चारचाकी वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एमएच– 49/ एयफ– 5605 क्रमांकाच्या मोटरसायकला धडक दिली. या अपघतात मोटरसायकल स्वार फिर्यादीचा लहान भाऊ नामे– अधिर रमेश तांबे, वय 32 वर्ष, रा. पारडी, भवानी मंदीर गुरूदेव पान मंदीर जवळ, नागपुर याचा जागाच मृत्यू झाला. तर मागे बसलेला इसम नामे– धिरज दादरी प्रसाद शाहु, वय 27 वर्ष, रा. कपील नगर, नारी रोड, नागपुर शचा मेयो हॉस्पीटल नागपुर येथे उपचारा दरम्यान मृत्यू झाला. तसेच अनोळखी महीला जखमी झाली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अमोल रमेश तांबे, वय 38 वर्ष, रा. पारडी, भवानी मंदीर गुरूदेव पान मंदीर जवळ, नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. उबाळे 8830332007 हे करीत आहे.

### प्रतिबंधीत बियाणे विक्रीकरिता बाळगणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 15 कि. मी. अंतरावर मौजा घोगरा येथे दिनांक 04/06/2020 चे 13.00 वा. 13.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– योगिराज शेषराव जुमडे, वय 53 वर्षे हे तालुका कृषी अधिकारी तथा बियाणे निरीक्षक नरखेड असुन त्यांना मुकबीरा व्दारे खबर मिळाली की, घोगरा येथील आरोपी नामे– विनायक वसंतराव मोहोरीया, वय 57 वर्षे, रा. घोगरा ता. नरखेड याने त्याच्या राहत्या घरी महाराष्ट्र शासनाने प्रतिबंध असलेले बोगस बनावटी कापुस बियाणे आणले आहे. अश्या मिळालेल्या खबरे वरून फिर्यादी व पोलिस स्टेशन जलालखेडा येथील पोलिस स्टाफने आरोपीच्या घरी धाड टाकली असता आरोपीने स्वताच्या फायदयासाठी प्रतिबंधीत असलेली बियाणे शेतकऱ्यांना विक्री करून शेतकऱ्यांची व महाराष्ट्र शासनाची फसवणुक करतांना मिळुन आला. आरोपीच्या ताब्यातुन सिकंदर आर आर वीड गार्ड 53 पाकीटे किंमती 53,000/–रू, बी.जी. एम. वीड गार्ड 50 पाकीटे किमती 50,000/–रू. असा एकुण 103 बनावटी कापुस बियाणेचे पाकीटे कि. 1,03,000/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपी विरुध्द कलम 420 भादंवि. सहकलम 3, 7 अत्या.वस्तु अधि.1955, बीज अधिनियम कलम 7 (ब)21 बियानेचे नियम 1968 कलम 7,8,9,10 बियाने (नियंत्रण) आदेश 1983 कलम 3 अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि राजेंद्र सोनवने 7798801816 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर